*Loksatta*, Panaji, October 16, 2005

# गोव्याच्या मातीचे आक्रंदन

गोवा पर्यावरण रक्षणात खूप जागरूक आहे असं आम्ही म्हणतो, पण खाणमालक आणि त्यांना वरदहस्त देणारे सरकार आणि प्रशासन यांच्या धाकधपटशाला तोंड देणे कोणालाच जमलेले नाही. गोव्याच्या सुपीक जमिनीतून, वर्षाकाठी कित्येक लक्ष टनांहून अधिक माती हायड्रोलिक एक्साव्हेटर्स, कॉडर्स, रीपर डोझर व डंपर वापरून अक्षरशः पिंजून काढली जाते. निर्यात होण्यापूर्वी तो माल उघड्यावर ठेवला जातो किंवा लोकवस्तीतून नेला जातो. तो पावसाळ्यात, नद्यानाले, फळबागा, शेते यात वाहून जातो. आता चिनी बाजारपेठ खुली झाल्यापासून तर २३ दशलक्ष टनांवरून ३३ दशलक्ष टनांपर्यंत गोव्याच्या खनिज निर्यातीने झेप घेतली आहे, त्यामुळे संपूर्ण ग्रामजीवनच उद्ध्वस्त होऊ लागले असून अजूनही जो शेतकरी तग धरून आहे, त्याची ससेहोलपटच चालू झाली आहे. त्याच्या हक्काचे- उपजीविकेचे साधन त्याच्याकडून जुलूम-जबरदस्तीने हिरावून घेतले जातेय आणि या प्रकरणात सरकार किंवा कायदेकानूही त्याच्या मदतीला येऊ शकलेले नाहीत. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाचेही खिसे गरम केले जात असल्याचा आरोप होतोय. गोव्याच्या खनिज उद्योगाचा, प्रामुख्याने [illegible]र तालुक्यांच्या विस्तृत अभ्यासातून एका ज्वलंत प्रश्नावर टाकलेला हा प्रकाशझोत!

'आमच्या सर्व विहिरी आटल्या. आमच्या शेतांना पाणी पुरविणारी आमच्या गावची तारणहार कुशावती नदीचाच चिखल बनला आहे. शेतीवर अवलंबून असणारी आम्ही माणसं, पण निसर्गसंपदाच नष्ट होऊ लागल्यानं शेतीच उद्ध्वस्त होऊ लागली आहे. झरे आणि नैसर्गिक पाण्याचे स्रोतही नष्ट झाल्याने नगदी पिके हातची गेली,'' हक्काची शेतीच नष्ट झाल्याने भलीमोठी कुटुंबे पोसणारे व सध्या हलाखीत दिवस कंठणारे गोविंद गोपाळ फडते व सप्तू घुटको फातर्पेकर आपली कर्मकहाणी ऐकवत होते.

गोवा म्हणे केवळ नितांत सुंदरता, विस्तीर्ण समुद्रकिनारे, नारळ-पोफळीचे बागबगीचे आणि हिरवीगार वनसंपदा असाच जर तुमचा समज असेल, तर तुम्ही फसाल! वखवखलेल्या नजरेने सुपीक जमिनी आणि हिरव्यागार वनसंपत्तीचे लचके तोडणाऱ्या खनिज उद्योगाने गोव्याच्या निसर्गावर खोलवर ओरखडे ओढले आहेत. गोव्याच्या अंतर्गत भागातील जीवनसंस्कृतीवर घाले घातले आहेत. राज्य सरकार व प्रशासनावरील या ~~खनिज लॉबीची पकडही कल्पनेपलीकडील आहे. म्हणूनच त्यांची गावेच्या गावे उद्ध्वस्त होताना मूकपणाने हा~~ अन्याय सहन न होऊ शकणारे लोक- शेतकरी आवाज उठवू पाहतात तेव्हा सरकार- पोलिसांच्या पोलादी पंजाने तो चिरडून टाकण्याचा हरेक प्रयत्न केला जातो. कोणताही पक्ष सत्तेवर येवो, त्यात फरक पडत नाही.

कल्पना करा, शेतात लोंब्या आहेत, पण त्यात धान्याचा दाणा नाही. पिके जवळजवळ नष्ट झाली आहेत. शेतापुढेच असलेल्या आपल्या घराच्या दारात उभी राहून एक महिला शेतकरी कांचन पाईक आपली व्यथा बोलून दाखवते. आम्ही दरवर्षी किमान १० गोणी भाताचे पीक काढीत असू. या वर्षी दोन गोणी पीकही निघाले नाही. खनिज मालकांनी आमच्या झऱ्याचे पाणी वळविल्यामुळे आमच्या शेतातील पाण्याचे नैसर्गिक स्रोतच नाहीसे झाले.

पाण्याचे हे नैसर्गिक स्रोत काही ठिकाणी माणसांना काय, जनावरांनाही देणे धोक्याचे बनले आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, खनिज उत्पादनामुळे आपद्ग्रस्त बनलेल्या बहुतेक शेतकऱ्यांना गेली अनेक वर्षे नुकसानभरपाईही देण्यात आलेली नाही.

"खनिज कंपनीने अगदी हाताशी आलेली माझी बागच निर्घृणपणे नष्ट केली. सहा हजार चौ. मी. जमिनीत नारळ, पोफळी, काजूची झाडे लावली होती. ही ५०० झाडे कसायाप्रमाणे कापून टाकण्यात आली. तरी मला न्याय मिळत नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या न्यायालयात कित्येक वर्षे माझा खटला खितपत पडला आहे,'' आखातातून कमावलेले पैसे घेऊन वडिलोपार्जित जमिनीत नवे काहीतरी करून दाखविण्याच्या इर्षेने उतरलेल्या रामनाथ वेळीपने अश्रू पुसत आपली कैफियत ऐकवली. उत्तरेत शिरगाव-मुळगाव येथे भातशेती नष्ट झालेल्या नारायण महादेव पेडणेकर (७२) यांचीही व्यथा वेगळी नाही. तो २० वर्षे न्यायालयात केवळ झुंज देत बसला आहे. वेळीप किंवा पेडणेकर यांच्या मालकीच्या शेतीच्या शेजारी खनिज पट्टा आहे आणि ते काढण्याचा पोर्तुगीजकालीन परवाना असणाऱ्या खनिज निर्यातदाराला शेतकऱ्यांना गृहीत धरण्याची सवय झाली आहे. पोलीसही त्याच्या बाजूने असल्याने तो परवाना दाखवून कोणाच्याही शेतात, कुळागरात बिनदिक्कत घुसू शकतो. वास्तवात शेतमालकाच्या परवानगीशिवाय खनिज उत्पादनाचे काम सुरूही करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी त्या संदर्भात निर्णय देऊनही शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारी कृत्ये शिक्षित गोव्यातही राजरोस चालतात. गावातील खनिज निर्यातदारांनी वरच्या भागाकडे आपला मोर्चा वळविल्यावर डोंगरावरील आपले घर सोडून रामनाथ वेळीपचे वडील पायथ्याशी येऊन घर बांधून राहिले. आता डोंगर बोडके करून झाल्यावर खनिज निर्यातदारांची नजर पायथ्याकडे वळली आहे. "आधी खनिज निर्यातदार शेतात माल टाकतात, मात्र शेतेच विकत घेण्याचा प्रस्ताव ठेवतात, अशी खनिज पट्ट्यातील बरीच शेती २० वर्षांत त्यांच्या ताब्यात आली आहे,'' वयोवृद्ध शास्त्रज्ञ डॉ. जयवंतराव सरदेसाई माहिती देतात.

खनिज उत्पादनाची कामे हल्लीपर्यंत मजूर आपल्या हातांनी करीत, पण गोव्याच्या मुक्तीनंतर केंद्र सरकारकडूनही खनिज निर्यातदारांना कृपाछत्र लाभले आणि हातांची जागा अवजड यंत्रसामग्रीने घेतली. फेरो-मँगेनिज व कच्चा धातू गोव्याच्या मातीत बऱ्याच ठिकाणी सापडतो. मँगेनिजही ठराविक पट्टीत लहान लहान ठिकाणी मिळते व त्यासाठी स्थानीय भौगोलिक स्थिती, भूगर्भीय व भूस्तरीय विशेष ज्ञानाची आवश्यकता असते व या कामात निपुण मजुरांची अधिक गरज भासते. फेरो-मँगेनिजला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक मूल्य असले तरी त्या कामातील तितक्याच कठीण अडचणींमुळे हे खनिज कमीच मिळत असते. त्याउलट, कच्च्या धातूचे उत्खनन पोखलेन, बुलडोझर आदी अवजड यंत्रसामग्री वापरल्याने सहज सोपे होते. ही यंत्रे कामात उतरविली की अख्खा डोंगर होत्याचा नव्हता करायला वेळ लागत नाही. तिथले वृक्ष, झाडे-झुडपे क्षणात नष्ट होतात. त्यानंतर डोंगराचा वरचा भाग खातमा केला जातो.

"या यंत्रणा काही तासांत डोंगर-वनसंपत्ती यांची नासधूस करून टाकतात. हिंस्र जनावराने एखादे निष्पाप श्वापद क्षणात झडप घालून डोळ्याचे पाते लवते न लवते तोच ते मट्ट करून टाकावे तसे,'' एक स्थानिक लढवय्ये शेतकरी व पर्यावरणवादी व्यंकटेश प्रभुदेसाई आपले अनुभवाचे बोल ऐकवतात. सध्या बरेच राजकारणी ही अवजड यंत्रसामग्री बाळगून आहेत व खनिज धंद्यात येत आहेत. लोकांचा आवाज दाबून टाकण्यात त्यांनी मोठीच कर्तबगारी बजावली आहे.

